**(eFiling) फौ.कि.क्र.१९/२०२५**
**निशाणी क्र.६**

## भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २२३ अन्वये व्हेरीफिकेशन

**MHPU180001412025**

मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते की-

माझे नाव - सुजाता हरिश्चंद्र चाबुकस्वार,
वय - ६५ वर्षे, व्यवसाय- घरकाम,
राहणार - भीमनगर, दौंड, ता. दौंड, जि. पुणे.

मी महेंद्र साळवे, रवी साळवे, जनाबाई साळवे आणि उदय साळवे यांच्याविरूद्ध केस केली आहे. आमची जागा चारही बाजूंनी तीन-तीन फुट सोडलेली आहे. दि.१५/१२/२०२४ रोजी त्यांनी माझ्यासोबत भांडण केले व म्हणले की, ती जागा आमची आहे. त्यांनी शिवीगाळ केली. आमच्याविरूद्ध कम्पलेन्ट केली तर जिवे मारू, अशी धमकी दिली. मी दि.१८/१२/२०२४ रोजी दौंड पोलिस ठाण्यात कम्पलेन्ट द्यायला गेली. मात्र पोलिसांनी माझी कम्पलेन्ट घेतली नाही. त्यानंतर मला उदय साळवे म्हणला की, पोलिस स्टेशनमध्ये माझी ओळख आहे, कुठं बी जा. त्यानंतर मी पोलिस ठाण्याला पोस्टाने कम्पलेन्ट पाठविली. तरी पोलिसांनी माझी तक्रार नोंदवून घेतली नाही. त्यामुळे मी ही कम्पलेन्ट केली आहे.

वा.दा.ब.अ.क.के.

श्रवणोत्तर स्विकृत,

सही ----------

Digitally signed by BADGUJAR GAJANAN SHIVDAS
Date: 2025.03.20 13:25:49 +0530

दिनांकः २०/०३/२०२५.

(जी.एस.बडगुजर)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दौंड.